महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/एकलव्य/नविन मंजूरी/२०१६-१७/१४अई (१७७२३ दि. 27 JUN 2016

परिपत्रक :-

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.
२. विभागीय शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,
सर्व विभाग

विषय : पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांनी एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी आवेदनपत्रे सादर करणेबाबत.
नवीन मंजूरी/नूतनीकरण सन २०१६-१७.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.एससीएच/१०१५/८१/मशि-४, दि.७ फेब्रुवारी,१९९६.

संदर्भांकित शासन निर्णयान्वये कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या विद्याशाखांच्या अतंर्गत पदव्युत्तर शिक्षण घेणा-या आणि विहित अटी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने सन १९९५-९६ या वर्षापासून एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे.

२/-आपल्या कार्यक्षेत्रातंर्गत सन २०१६-१७या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०/०९/२०१६ अखेरपर्यंत विहित नमुन्यात अचुक व परिपुर्ण भरलेली आवेदनपत्रे सहपत्रासह मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव स्विकारण्याचा अंतिम दि.३०.९.२०१६ असून त्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

३/- एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी पात्रतेच्या प्रमूख अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. पदवी परीक्षेत विज्ञान शांखेत किमान ७० टक्के गुण, तर कला, वाणिज्य, विधी शाखेत किमान ६० टक्के गुण मिळविलेले असावेत. (शासनाकडून प्राप्त आर्थिक तरतूदीनुसार गुणानुक्रमे जास्त गुणानुसार अर्जाचा विचार करण्यात येईल).

२. संबंधित विद्यार्थ्यांचे व त्याच्या आई-वडिलांचे/पालकांचे सर्व मार्गांनी मिळून मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/ पेक्षा अधिक नसावे.

३. पदव्युत्तर द्वितीय वर्षासाठी आर्थिक सहाय्याचे नुतनीकरण मंजूर करण्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे,व वार्षिक ७५ टक्के नियमित उपस्थिती आवश्यक आहे. चांगली वर्तणूक असणे आवश्यक आहे. याबाबत प्रचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांचे सुस्पष्ट प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या व ए.टी.के.टी मिळालेल्या विद्यार्थ्यांना नुतनीकरण मंजूर करता येत नाही. याची कृपया नोंद घ्यावी

तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या आर्थिक तरतूदीच्या आधीन राहून गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे संबंधित विद्यापीठनिहाय मंजुरी देण्यात येईल.

४. हया योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना रु.५०००/ प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

५.एकलव्य आर्थिक सहाय्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले नविन मंजूरीचे आवेदनपत्रे विद्यापीठे/महाविद्यालये यांनी त्यांचे स्तरावर जबाबदारीने तपासून न पाहता पाठविली जातात असे संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे म्हणून पात्र विद्यार्थ्यांना एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी अडचणी निर्माण होतात व कार्यालयाचा वेळ खर्च होतो. विद्यार्थ्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यास विलंब होऊ नये किंवा विद्यार्थी आर्थिक सहाय्यापासून वंचित राहू नये म्हणून नविन मंजूरीचा प्रस्ताव सोबत दिलेल्या सूचनाप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालये यांनी प्रथम त्यांचे स्तरावर अर्ज तपासूनच अंतिम मंजूरीसाठी या संचालनालयाकडे दिलेल्या विहित मुदतीतच पाठविण्यात यावेत. लाभार्थी विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरावीत म्हणून सदरचे परिपत्रकांची प्रत फलकावर लावावी. तसेच सदरचे प्रस्ताव हे फक्त विद्यापीठे / महाविद्यालयामार्फतच स्विकारुन विचारात घेतले जातील.

६. अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी त्याचा सद्याचा स्वतःचा सुरु असलेला खाते क्रमांक, बँकेचा संपूणे पत्ता, बँक शाखा, कोड नंबर, आयएफएससी कोड, अधारकार्ड क्रमांक, विद्यार्थ्यांचा दूरध्रमण क्रमांक, इत्यादी माहिती बिनचूकपणे अर्जात नमूद करावी.

८. विद्यार्थ्यांने बँक खातेच्या पासबुकाची पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

९. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्याचे आवेदनपत्रा सोबत सर्व विद्यार्थ्यांची यादी अ.नु. क्रमांक ७ मधील तपशीलासह व इतर आवश्यक तपशीलासह पाठवण्यात यावी.

उपरोक्त सुचाना आपल्या स्तरावर सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळवून एकलव्य आर्थिक योजनेचे आवेदनपत्रे विहीत मुदतीत या संचालनालयास पाठविणेबाबत, कळविण्यात यावे.

**(डॉ. वि.रा. मोरे)**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१**